# नृत्यकलेतील गणपती

– डॉ. पं. नंदकिशोर कपोते

सर्व देवांचा आदिदेव गणेश. देवी-देवतांमध्ये श्रीगणेशाला अग्रक्रम दिला जातो. प्रथम पूजेचा मान श्रीगणेशाचा. कुठल्याही एखाद्या नवीन चांगल्या गोष्टीचा प्रारंभ करायचा असेल, तर प्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते. आज 'श्रीगणेशा झाला' हे शब्द तर सर्वांच्याच ओठी असतात. महाराष्ट्रात तर गणेशाला अनन्यसाधारण महत्त्व. प्रत्येक वर्षी गणपतीची आतुरतेने वाट पाहणारा भक्तगण गणेशाच्या आगमनाने गणेशाचे मुखचंद्र पाहून धन्य धन्य होतो. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना हवाहवासा वाटणारा, मन:शांती देणारा, आनंददायी, सर्व दु:खांचे हरण करणाऱ्या विघ्नहर्त्या गणेशाचा अवर्णनीय अनुपम सोहळा गणेशोत्सव म्हणजे एक पर्वणीच.

कला प्रांतातही गणपतीला एक अढळस्थान आहे. गायन, वादन, नृत्यातून गणपतीचे विविधतेने नटलेल्या विविध रूपांचे सर्वांगसुंदर दर्शन घडते.

लोकसंगीत, शास्त्रीय संगीत व सुगम संगीतात गणपतीवर रचित अनेक मराठी, हिंदी, तसेच सर्व भाषाशैलींतील गीते, लोकप्रिय आहेत. अनेक कवी, गीतकारांनी आपापल्यापरीने, गणेशाचे सौंदर्यशाली वर्णन आपल्या रचनांमधून केले आहे. वादनात उत्कृष्ट वादक कौशल्यपूर्ण रितीने तबला, पखवाज, मृदंगाद्वारे विविधांगी बोल, गणेश परन आदी बोल वाजवून गणेशाला वंदन करताना दिसतात.

नृत्यकलेत तर नर्तक-नर्तकीच्या हृदयपटलावर श्रीगणेशाचे नाव कोरलेले दिसते. याचा प्रत्यय नर्तकाच्या प्रत्येक नृत्यकार्यक्रमातून दृष्टीस पडतो. लोकनाट्य, लोककलेतही प्रारंभी गणेशाची आराधना केली जाते. 'पहिलं नमन' आणि 'शुभमंगल चरणी गण नाचला' या गीताद्वारे गणेशाचे नृत्य पाहावयास मिळते. 'गणराज रंगी नाचतो' या सुप्रसिद्ध गीताद्वारे तर नृत्यकलेतील गणेशाच्या नृत्यरूपाचे प्रकर्षाने दर्शन घडते.

अशा या आराध्य दैवत गणेशाचे वर्णन अतिशय प्राचीन काळापासून नृत्यात केलेले आढळते. विविध प्राचीन ग्रंथांत गणेशाचा नामोल्लेख केलेला दिसून येतो. आचार्य भरतमुनी लिखित 'नाट्यशास्त्र' व आचार्य नंदिकेश्वर लिखित 'अभिनय दर्पण' हे आदिग्रंथ याचे सर्वांत मोठे प्रमाण (पुरावा) आहेत. वैदिक काळापासून आठव्या शताब्दीपर्यंत नाट्यशास्त्राची निर्मिती झाली. भरतमुनींचा 'नाट्यशास्त्र' हा ग्रंथ सर्वांत प्राचीन आहे. यानंतर 'अभिनय दर्पण', आचार्य अभिनवगुप्त यांचा 'अभिनव भारती', आचार्य धनंजय यांचा 'दशरूपक', आचार्य सागरनंदी यांचा 'नाट्यलक्ष रत्नकोश', शारदा तनय यांचा 'भाव प्रकाशन' अशा विविध ग्रंथांची इ.पू. सातव्या शताब्दीपासून सतराव्या शताब्दीपर्यंत निर्मिती झाली. या सर्व ग्रंथांतून, संस्कृत साहित्यातून मूर्तिकला, शिल्पकलेची परंपरा वर्णन करताना, पुरावे (प्रमाण) देताना इंद्र, विष्णू, सरस्वती, लक्ष्मी, तर प्रारंभी गणेश शब्दाचे वर्णन केलेले दिसते. कला परंपराही गुप्तयुग, वाकाटक, चालुक्य, पल्लव आणि चोल युगांत विकसित झाली. यांतील गुप्तयुग हे भारतीय कलेचे सुवर्णयुग मानले जाते. दुसऱ्या शताब्दीमध्ये गुप्तयुगात गणेश, शिव, विष्णू, दुर्गा, लक्ष्मी या देवी-देवतांच्या मूर्ती निर्माण झाल्या. या मूर्तींच्या

भावभंगिमा मुद्रा कलेच्या गौरवशाली परंपरेची प्रचिती देतात, असा उल्लेख आचार्य गैरोला यांच्या 'भारतीय नाट्य परंपरा' व 'अभिनय दर्पण' ग्रंथात केलेला आढळून येतो. यावरून नृत्यकलेत श्रीगणेशाला प्राचीन काळापासून अनन्यसाधारण महत्त्व आहे हे सिद्ध होते.

आज भारतीय शास्त्रीय नृत्यशैलींचे अकरा प्रकार पाहावयास मिळतात. उत्तर प्रदेशातील कत्थकनृत्य, तामीळनाडूचे भरतनाट्यम नृत्य, केरळचे कथकली व मोहिनीअट्टम नृत्य, मणिपूरचे मणिपुरी नृत्य, ओडिशातील ओडिसी नृत्य, आंध्र प्रदेशातील कुचीपुडी नृत्य व बिहारचे छाऊ नृत्य यांशिवाय गौडिया नृत्य, सत्रिय व थांगता नृत्य या सर्व शैलींचा आत्मा देवी-देवता आहेत. सर्व नृत्यप्रकारांत गणेशनृत्य केले जाते. नृत्य नर्तन करणारा गणपती ज्याप्रमाणे प्राचीन शिल्पांमध्ये आढळतो, त्याप्रमाणेच या नृत्यशैलींमधून श्रीगणेशाचे दर्शन घडते. शास्त्रीय नृत्याचे प्रस्तुतीकरण करताना नर्तक प्रारंभी गणेश आराधना, गणेश स्तुती सादर करतो, तसेच नृत्य सादरीकरणातून पुढे गणेश नृत्य प्रस्तुत करताना दिसतो.

या सर्व नृत्यशैलींमध्ये कत्थकनृत्यशैलीत श्रीगणेशाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. इ.पू. ५०० वर्षांपूर्वीपासून कत्थक नृत्यात पूर्वजांनी गणेशावर विविध रचना, बंदिशी केलेल्या आढळतात. त्या आजही प्रचलित आहेत. नृत्यास प्रारंभ करण्यापूर्वी नर्तक गणेश व इष्ट देवतांना नमन करून या गणेश नृत्यरचनांचे सादरीकरण करतो. नृत्य प्रस्तुतीत गणेश वंदना, गणेशस्तुती यांमध्ये प्रामुख्याने संस्कृत श्लोकांचा वापर अधिक दिसतो, जसे :

**उदा. 'वक्रतुंड महाकाय सूर्य कोटि समप्रभः।**
**निर्विघ्नम् कुरूमे देवो सर्व कार्येषु सर्वदा।।'**

याशिवाय, कत्थक नृत्यात गणेशस्तुतीवर आधारित भजनेही केली जातात.

यमनकल्याण रागातील चौतालातील भजन :

**'प्रथम सुमर श्री गणेश गौरी सुत प्रिय महेश**
**सकल भुवन भये कलश दूर से निवारे**
**लंब उदर, भूज विशाल, कर त्रिशुल चंद्रभाल**
**शोभत गले पुष्पमाल, रक्तवसन धारे**
**रिद्धि सिद्धि दो नार चमर करत बार बार**
**मूषक वाहन सवार भक्तन हितकारे'**

वरील भजनात गणेशाचे सुरेख वर्णन पाहावयास मिळते. तसेच, तुलसीदासांची पुढील रचना :

**'गाइए गणपती जगवंदन,**
**शंकर सुवन भवानी नंदन**
**सिद्धी सदन गजवदन,**
**विनायक, कृपासिंधु सुंदर सबलायक,**
**मोदक प्रिय, मुरमंगल दाता,**
**विधा वारधि बुद्धि विधाता**
**मांगत तुलसीदास कर जोरे**
**बसवू राम सिया मानस मोरे'**

यावरही कत्थक नृत्य प्रस्तुत केले जाते. कत्थक नृत्यातील सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे १६ मात्रांच्या या तीनतालाप्रमाणेच २१ मात्रांचा ताल 'गणेशताल' या नावाने प्रसिद्ध आहे. या गणेशतालात नर्तक कत्थक नृत्यातील सर्व पारंपरिक बंदिशी थाट, उठान, आमद, तोडे, परण, कवित्त प्रस्तुत करत असतो. यातून कत्थक नृत्याचे श्रीगणेशाशी असलेले घट्ट नाते निदर्शनास येते. कत्थक नृत्यात गणेशावर रचलेले प्राचीन पारंपरिक बोल आजही लोकप्रिय आहेत व कत्थक नर्तक आपल्या नृत्यप्रस्तुतीत हे गणेश कवित्त बोल आजही सादर करताना दिसतात.

**उदा. १) गं गं गणपती गजमुख मंडल**
**गिटगिण गिट गिण तत्तत् थै**
**जय जगवंदन वक्रतुंड ज्ञानी दाता**
**विघ्नहरन सुखकरण धागेन धागेतिट....**

**२) तांडवनृत्यकरी गजानन**
**धुमकिट धुमकिट वाजे मृदंग,**
**ब्रह्मा तालधरी गजानन**
**तेहतीस कोटि द्विजगणदाटी,**
**मध्ये शिवगौरी गजानन**

नामी रंगले दास सदोदित,
शोभे चंद्रशिरी गजानन

( स्वामी रामदास )

३) गंगंगं गणपती गजाननम्,
विघ्नेश्वर ज्ञानी दाता
अष्टरूप गजवदन चतुर्भुज शुभारंभ दाता
वक्रतुंड सुंदर विशाल मस्तक,
एकदंत सोहे मोहे
जय गणेश लंबोदर,
एकदंत धा एकदंत धा एकदंत धा

गणेशावर रचलेल्या अशा हजारोंनी सुंदर बंदिशी कत्थक नृत्यात पाहावयास मिळतात.

महाराष्ट्रात, तसेच अनेक राज्यांतून गणेशोत्सवाच्या काळात नृत्यमहोत्सव आयोजित केले जातात. यांत अनेक नामवंत कलाकार गणेशस्तुती, गणेशवंदना, गणेश भजन यांशिवाय गणपतीवर नृत्यनाटिका (बॅले) करीत असतात. 'मोरया मोरया' या मराठी गाण्यावर नंदकिशोर कल्चरल सोसायटीच्या २१ कलाकारांनी कत्थक नृत्यशैलीत गणेश नृत्य मुंबई दूरदर्शनवर माणिक रत्न सोहळ्यात प्रस्तुत केले आहे, तर 'सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची' या गणपतीच्या आरतीवर दिल्ली येथील महाराष्ट्र मंडळात गणेश महोत्सवात कत्थक नृत्य सादर केले. भारतातील दिग्गज कलाकार पं. बिरजू महाराज, कत्थक क्वीन सितारा देवी, स्व. रोहिणी भाटे, सोनल मानसिंग, यामिनी कृष्णमूर्ती, हेमा मालिनी यांनी गणेशावर नृत्यनाटिकांची निर्मिती केली आहे. याद्वारे गणेशाचे विविध कथाप्रसंग, गणेशलीला यांचे लालित्यपूर्ण विलोभनीय दर्शन घडले.

मूर्ती (शिल्प) कला, नृत्यसंगीत यांद्वारे दृष्टीस पडणारी गणपतीची सर्वांगसुंदर नृत्यरूपे पाहून नृत्यकलेतील गणपतीचे माहात्म्य सिद्ध होते.

**ओम गं गणपतये नमः।**
**ओम गं गणेशाय नमः।।**

**– डॉ. पं. नंदकिशोर कपोते**
पुणे
भ्रमणध्वनी : ०९३७१० ९९९९९